# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**विषय - दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या ( हंगामी ) स्वरूपात**
**६ महिने कालावधीकरिता पद भरणेबाबत...**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागात दरमहा एकत्रित मानधनावर खाली नमूद केलेल्या पदांसाठी (हंगामी) तात्पुरत्या स्वरुपात ६ महिने कालावधीकरिता तात्पुरत्या स्वरुपात भरणेबाबत, प्रस्तुत जाहिरातीतील नमुद केलेल्या पदांची शैक्षणिक अर्हता व इतर बाबींची पुर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून पोस्टाने अथवा समक्ष उपस्थित राहून थेट पध्दतीने मुलाखत घेणेकामी अर्ज मागविणेत येत आहे.

अर्जामध्ये चुकीची अथवा खोटी माहिती सादर करणाऱ्या उमेदवारांना निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविणेत येईल. पदनाम, पदसंख्या, एकत्रित मानधन व आरक्षण खालीलप्रमाणे :

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | दरमहा एकत्रित मानधन | | सामाजिक आरक्षण | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अनु. जाती | अनु. जमाती | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | वि. मा. प्र. | इ. मा. व. | आ. दु. घ. | सा.शै. मा.प्र. | खुला |
| १ | पशुवैद्यकीय अधिकारी (ABC सर्जन) | ३ | ८५,०००/- | ०१ | - | ०१ | - | - | - | - | - | - | - | ०१ |
| २ | आरोग्य निरीक्षक | २ | ३०,०००/- | ०१ | - | - | - | - | - | - | - | - | - | ०१ |
| ३ | लाईव्ह स्टॉक सुपरवायझर | ३ | ३०,०००/- | ०१ | - | ०१ | - | - | - | - | - | - | - | ०१ |
| ४ | डॉग पिग कुली | ८ | २६,४९७/- | ०१ | ०१ | ०१ | - | - | - | - | ०१ | ०१ | ०१ | ०२ |
| एकूण | | १६ | | | | | | | | | | | | |

वरील प्रवर्गनिहाय पदसंख्या व आरक्षण यामध्ये बदल होण्याची शक्यता असून त्याबाबतचे सर्व अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना राहतील.

१. **वयोमर्यादा : -**
उपरोक्त पदांसाठी सर्व प्रवर्गातील उमेदवारांचे वय जाहिरातींच्या दिनांकास किमान १८ वर्षे पुर्ण असणे आवश्यक राहील. तसेच खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी ४३ वर्षे इतकी राहील.

२. **शैक्षणिक अर्हता :-**

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | पशुवैद्यकीय अधिकारी (ABC सर्जन) | १) पशुवैद्यक शास्त्रामधील पदवी (BVSc & AH) उत्तीर्ण आवश्यक .<br>२) श्वान संतती नियमन कार्यक्रम अंतर्गत किमान ६ महिने कामकाजाचा अनुभव आवश्यक. |
| २ | आरोग्य निरीक्षक | १) शासनमान्य संस्थेमधून आरोग्य निरीक्षक पदविका आवश्यक.<br>२) श्वान संतती नियमन कार्यक्रम अंतर्गत किमान ६ महिने कामकाजाचा अनुभव आवश्यक. |
| ३ | लाईव्हस्टॉक सुपरवायझर | १) शासनमान्य संस्थेकडील पशुवैद्यक शास्त्रातील किमान पदवीका उत्तीर्ण आवश्यक.<br>**किंवा**<br>मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील लाईव्ह स्टॉक सुपरवायझर कोर्स उत्तीर्ण असावा<br>२) श्वान संतती नियमन कार्यक्रम अंतर्गत किमान ६ महिने कामकाजाचा अनुभव आवश्यक. |

| | | |
|---|---|---|
| ४ | डॉग पिग कुली | १) इयत्ता ४ थी परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) शारिरिक कष्टाची कामे करण्यास सक्षम असणे आवश्यक.<br>३) श्वान संतती नियमन कार्यक्रम अंतर्गत किमान ६ महिने कामकाजाचा अनुभव आवश्यक. |

**<u>अटी आणि शर्ती</u>**

१) मानधनावरील नेमणुका पूर्णपणे तात्पुरत्या हंगामी स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास कोणत्याही कायम पदी नेमणुकीचा हक्क राहणार नाही.

२) ज्या दिवशी म. न. पा. स सदर पदाची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीशीशिवाय मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येईल.

३) मुलाखतीस येण्याकरिता उमेदवारास कोणत्याही प्रकारच्या प्रवासभत्ता दिला जाणार नाही.

४) उपरोक्त पदासाठी विहित केल्यानुसार तसेच शैक्षणिक अर्हता व कामाच्या अनुभवानुसार मानधन अदा करण्यात येईल.

५) सर्व उमेदवारांनी मुलाखतीसाठी उपस्थित राहताना शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपात्र व अनुभवांबाबतच्या आवश्यक त्या प्रती व साक्षांकित केलेल्या प्रती उदा. गुणपत्रिका (मार्कशीट), सर्टिफिकेट, फोटो इ. सादर करणे बंधनकारक आहे.

६) निवड केलेल्या उमेदवारांना मनपाने ठरवून दिलेल्या अटी शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहील. त्याप्रमाणे काम करणेस नकार दिलेस नेमणूक रद्द करणेत येईल.

७) सदर पदांची महाराष्ट्र आरक्षण कायदा २००४ नुसार मागासवर्गीयांचे आरक्षण लागू राहील.

८) उमेदवारांनी कार्यालयीन वेळा पाळणे बंधनकारक राहील. त्यामध्ये कोणतीही सवलत अनुज्ञेय नाही.

९) उमेदवारांची नेमणूक झाल्यानंतर बायोमेट्रिक पद्धतीने हजेरी नोंदविणे बंधन कारक राहील व हजेरी मस्टर वर रोजचे रोज स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्याशिवाय पगार अदा केला जाणार नाही.

१०) निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. सदर नेमणूक प्रक्रिया रद्द / फेरप्रक्रिया करणेचे अधिकार मा. आयुक्त सो. यांनी राखून ठेवले आहेत.

११) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवाकाळामध्ये काही आजार उदभवल्यास त्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१२) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी आदेश निर्गमित झालेपासून आठ दिवसांच्या आत रुजू होणे बंधनकारक राहील. अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

**तरी इच्छुक उमेदवारांनी Walk in Interview करिता शुक्रवार दिनांक ०४/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.आयुक्त कक्ष ४ था मजला, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ येथे उपस्थित रहावे.यासाठी समक्ष पत्रव्यवहार केला जाणार नाही. तसेच आलेल्या उमेदवारांचे रजिस्ट्रेशन मुलाखतीच्या दिवशी सकाळी १०.०० ते ११.०० या वेळेत केले जाईल. वेळेनंतर आलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.**

**टीप - उपरोक्त पदांकरिता उमेदवारांनी त्यांचे अर्ज व शैक्षणिक कागदपत्रे दिनांक २७/०६/२०२५ सायंकाळी ४.००वाजेपर्यंत पशुवैद्यकीय विभागात पोस्टाने अथवा समक्ष देणेत यावे.**

**सही/-**

**आयुक्त**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**